क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१०३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ८ ऑक्टोबर, २००२.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २२ ऑगस्ट, २००२ (गुरुवार) रोजी झालेल्या १०३ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति,
सर्व सदस्य.

निमंत्रित :-
शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-
विधी सल्लागार
मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
## १०३ व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक : २२ ऑगस्ट, २००२ (गुरुवार)

वेळ : सकाळी ११.३० वाजता

सभास्थान : मा. मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष,
६वा मजला, मंत्रालय,
मुंबई -४०० ०३२.

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.विलासराव देशमुख<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| डॉ.सय्यद अहमद<br>गृहनिर्माण मंत्री | सदस्य |
| श्री.जयदत्त क्षीरसागर<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उप सभापती,<br>विधान परिषद | सदस्य |
| श्री.महादेव देवळे<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री.सदानंद सरवणकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.अरुण गणेश देव<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.खान मोहम्मद हाजी अब्बास बसतीवाला<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |

| | |
|---|---|
| श्री.मंगेश श्रीधर सातमकर<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.सचिन अहिर<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.प्रद्युमन उ.महेता<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.व्ही.रंगनाथन्<br>शासनाचे मुख्य सचिव<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.क.घं.श्रीवास्तव<br>महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| श्री.अनिल कुमार लखिना<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य |
| श्री.अजित वर्टी<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी श्री.जयदत्त क्षीरसागर, नगर विकास राज्यमंत्री, श्री.सदानंद सरवणकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पदसिध्द सदस्य म्हणून तसेच श्री.अरुण देव,नगरसेवक, श्री.खान मोहम्मद हाजी अब्बास बसतीवाला, नगरसेवक व श्री.मंगेश सातमकर, नगरसेवक यांचे प्राधिकरणाचे सदस्य म्हणून प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचे स्वागत केले.

तसेच मा.अध्यक्ष यांनी माजी नगरविकास राज्यमंत्री श्री.सुनिल तटकरे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री.रा.ता.कदम, श्री.दिगंबर कांडरकर व श्री.विजय दारुवाले यांनी प्राधिकरणाचे सदस्य म्हणून केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, प्राधिकरणाने श्री.जनार्दन दा.जाधव, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त यांच्या दिनांक २ एप्रिल, २००२ रोजी, श्री.अमरनाथ बटब्याल, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माजी आयुक्त यांच्या दिनांक २८ जुलै, २००२ रोजी आणि श्री.सिताराम नारायण देसाई, माजी नगरविकास राज्यमंत्री यांच्या दिनांक ६ ऑगस्ट, २००२ रोजी झालेल्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली. तसेच प्राधिकरणाने श्री.जाधव, श्री.बटब्याल व श्री.देसाई यांच्या निधनाबद्दलच्या शोक संदेशांस (जोडपत्रे १, २ व ३) मंजूरी दिली.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

<u>बाब क्र.१</u> : <u>दिनांक १८ मार्च, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१०२व्या) बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे.</u>

कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

<u>बाब क्र. २</u> : <u>दिनांक १८ मार्च, २००२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१०२व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालाच्या वेळी खालील बाब टिप्पण्यांवर चर्चा झाली :-

<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या अंतर्गत (पर्याय व) हस्तांतरणीय विकास हक्क व रोख रकमेसहित भूसंपादन व बांधलेल्या सदनिका संपादन करणेसाठी प्राप्त निविदाकारांची निवड करणेबाबत.</u>

प्राधिकरणाचे सदस्य श्री.सचिन अहिर यांनी या विषयावर मागच्या बैठकीनंतर लिहिलेल्या पत्राकडे मा.अध्यक्ष, प्राधिकरण व मुख्यमंत्री यांचे लक्ष

वेधले आणि निविदेवर निर्णय प्रलंबित ठेवण्याची विनंती केली. त्यावर मा.अध्यक्षांनी सांगितले की, प्राधिकरणाच्या सदर बैठकीत श्री.अहिर जातीने उपस्थित होते व या मुद्यावर एकमताने निर्णय घेतला होता. मा.अध्यक्षांनी पुढे असेही सांगितले की, कार्यकारी समितीने सखोल विचार विनिमय करुन याबद्दल शिफारशी केल्या होत्या आणि प्राधिकरणाने या शिफारशींवर शिक्कामोर्तब केले होते. म्हणून त्या निर्णयाला प्रलंबित ठेवण्याची किंवा त्याबद्दल फेरविचार करण्याची गरज नाही.

त्यानंतर, श्री.मदान, प्रकल्प संचालक यांनी माहिती देताना सांगितले की, सदर निविदेस प्राधिकरणाची १८ मार्च, २००२ रोजी मान्यता मिळाल्यानंतर जागतिक बँकेने ८ एप्रिल, २००२ रोजी त्यांची स्विकृती दिली. त्यानुसार यशस्वी निविदाकारांना निविदा स्विकृती पत्र २२ एप्रिल, २००२ रोजी जारी करण्यात आले.

श्री.मदान यांनी पुढे सांगितले की, याबाबत श्री.मनोज मेहता यांनी एक लोक हितार्थ याचिका (PIL) आणि मे.व्हिडीओकॉन अतिथी शेल्टर्स यांनी एक याचिका मुंबई उच्च न्यायालयात सादर केली होती. जनहित याचिकेवर उन्हाळी सुट्टीतील न्यायाधिशांनी २४ मे, २००२ रोजी स्थगिती आदेश दिले. या याचिकेची सुनावणी सध्या सुरु आहे. व्हिडीओकॉन अतिथी शेल्टर्स यांच्या जागेवर किती सदनिका बांधणे शक्य आहे हे ठरविण्यासाठी उच्च न्यायालयाने दिनांक १६ ऑगस्ट, २००२ रोजी एका ४ सदस्यीय तांत्रिक समितीची स्थापना केली आहे. सदर समिती २६ ऑगस्ट, २००२ पर्यत आपला अहवाल सादर करेल व २७ ऑगस्ट, २००२ रोजी अंतिम सुनावणी होईल अशी अपेक्षा आहे.

बाब क्र.१० : **नायर हॉस्पीटलच्या विस्तारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस मंजूर केलेल्या कर्जाचा व्याजदर कमी करणे व अंमलबजावणीस मुदतवाढ देणे.**

महानगर आयुक्त यांनी सांगितले की, नायर हॉस्पिटलच्या विस्तारासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राधिकरणाने कर्ज मंजूर केलेले आहे परंतु कर्जासाठी आवश्यक असलेला करारनामा बृहन्मुंबई महानगरपालिकेने अद्याप केलेला नाही. मा.अध्यक्ष, प्राधिकरण यांनी करारनामा तातडीने करण्याबाबत महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना सुचना दिली.

बाब क्र.२० : **महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीची (एमयूआयएफ) स्थापना व त्यातील प्राधिकरणाचा सहभाग.**

श्री.सचिन अहिर, सदस्य यांनी महाराष्ट्र नागरी मुलभूत सुविधा निधीच्या (एमयूआयएफ) स्थापनेविषयी सद्यःपरिस्थिती काय आहे अशी विचारणा केली. याबाबत माहिती देताना महानगर आयुक्त म्हणाले की, एमयूआयएफच्या स्थापनेस मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच एमयूआयएफच्या दोन कंपन्यांचे नोंदणीकरण झालेले असून कामकाज प्रारंभ प्रमाणपत्र (Certificate of Commencement of Business) मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता करण्यात येत आहे. सप्टेंबर महिन्यात ही प्रक्रिया पूर्ण होईल.

वरील संदर्भात मा.अध्यक्षांनी विचारणा केली की, नागपूर सुधार प्रन्यास (Nagpur Improvement Trust) ज्याप्रमाणे नागरी विकासाची कामे करते त्याप्रकारे प्राधिकरण का काम करु शकत नाही. याबाबत खुलासा देताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या तरतूदीनुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६१ व ६३ अन्वये जी कर्तव्ये पार पाडावयाची आहेत त्या बाबींसाठी तरतूद केली असेल किंवा तरतूद करण्यात

येणार असेल त्यापैकी कोणत्याही बाबीसाठी बृहन्मुंबईत तरतूद करण्यासाठी प्राधिकरणास अधिकार नाहीत.

मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, निधीच्या अभावी मुंबई महानगर प्रदेशातील स्थानिक संस्था नागरी सुविधाचे मोठे प्रकल्प हाती घेऊ शकत नाहीत. तसेच स्थानिक संस्थांना कर्जे उभे करण्यासाठी कायद्याने बंधने घातलेली आहेत. प्राधिकरणाकडे असलेला निधी हा मुंबईतील जमिनीच्या विक्री केल्यामुळे मिळालेला आहे. सदरहू निधी मुंबईत महत्वाच्या भरीव योजना किंवा प्रकल्प राबविण्यासाठी करावा, ज्यायोगे मुंबई शहराच्या नागरी मुलभूत सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा करण्यास मदत होईल व मुंबई शहराची प्रतिमा उंचावेल. तसेच आवश्यकतेनुसार प्राधिकरणाच्या अधिनियमात सुधारणा करावी असे निदेश दिले. इतर सदस्यांनी मा.अध्यक्षांच्या सुचनेचे स्वागत केले.

नगर विकास राज्यमंत्री यांनी एमआयडीसी प्रदेशात सोयी-सुविधा पुरविणे गरजेचे आहे असे सांगितले. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका कर घेत असून नागरी सुविधा अपू-या आहेत असे निदर्शनास आणले. या संबंधात महानगर आयुक्त यांनी सांगितले की, याबाबत महानगरपालिका आयुक्त व इतर स्थानिक संस्था यांच्याबरोबर चर्चा करुन मुंबईत प्राधिकरणातर्फे कोणते प्रकल्प होणे शक्य होईल हे निश्चित करण्यात येईल व अधिनियम सुधारणेचा प्रस्तावही प्राधिकरणाच्या आगामी बैठकी पुढे सादर करण्यात येईल.

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी प्राधिकरणाच्या मागील बैठकीत केलेल्या सूचनेप्रमाणे प्रलंबित असलेल्या बाब टिप्पणीवर केलेला कार्यवाही अहवालही ठेवण्यात आला असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

२.२ त्यानंतर कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

<u>बाब क्र. ३ :</u> <u>प्राधिकरण / गृहनिर्माण मंडळ इत्यादी संस्था सन २००२-०३ या वित्तीय वर्षापासून प्राधिकरण आयकर कायद्याच्या नियंत्रणाखाली.</u>

३.१ महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरण हे "स्थानिक प्राधिकरण" या संस्थेत मोडत असल्यामुळे, आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२०) अन्वये आतापर्यंत प्राधिकरणास आयकर लागू नव्हता. सन २००२-०३ सालापासून आयकर कायद्यातील कलम १०(२०) मध्ये सुधारणा करण्यात आली असून स्थानिक प्राधिकरणाची व्याख्या भारतीय घटनेच्या कलम २४३ नुसार करण्यात आलेली आहे. त्यामध्ये पंचायत, नगरपरिषद, नगरपरिषद समिती, जिल्हा बोर्ड/कॅन्टोंन्टमेंट बोर्ड यांचाच फक्त समावेश आहे. तसेच आयकर कायद्यातील कलम १०(२०अ) मधील तरतूदही वगळण्यात आलेली आहे, त्यामुळे प्राधिकरणास आयकरापोटी मोठया प्रमाणात रक्कम भरावी लागणार आहे. तसेच प्राधिकरणाने शासनाच्या विविध संस्थांमध्ये जी रक्कम ठेव म्हणून गुंतविलेली आहे त्या रकमेवर प्राधिकरणास व्याज मिळत नसले तरी ते मिळाले असे समजून त्यावरही आयकर भरावा लागणार आहे असे महानगर आयुक्त यांनी सांगितले. महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी महाराष्ट्र शासनाचा निधी आयकराच्या स्वरुपात प्राधिकरणास केंद्र शासनास द्यावा लागणार आहे असे सांगितले. त्यासाठी केंद्र शासनाकडे अभिवेदन करावे असे सदस्यांनी सुचविले.

३.२ आयकर कायद्यामधील बदलाचा प्राधिकरणाच्या कामावर प्रतिकूल परिणाम होणार असल्यामुळे मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्याकडून केंद्रीय वित्त मंत्री तसेच केंद्रीय शहरी विकास व गरीबी उपशयन मंत्री यांना आयकर कायद्यातील बदलावर पुनर्विचार करण्याबाबत पत्राने विनंती करण्यात आलेली आहे. तसेच मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या सहीने केंद्रीय सचिव वित्त मंत्रालय व सचिव, शहरी विकास मंत्रालय यांनाही पत्राने विनंती करण्यात आलेली आहे. केंद्रीय शहरी विकास व गरीबी उपशयन मंत्री यांनी आयकर कायद्यातील कलम १०(२०) व कलम १०(२०अ) मधील तरतूदी पुन्हा पूर्ववत करण्यासाठीचा प्रस्ताव केंद्रीय वित्त मंत्रालयाकडे पाठविला आहे असे

महानगर आयुक्त यांनी पुढे सांगितले. तसेच मे.वन्सी महेता, आयकर सल्लागार यांच्या सल्ल्यानुसार प्राधिकरणाने आयकर कायद्यातील कलम १२(अ) प्रमाणे प्राधिकरणाची ट्रस्ट म्हणूनही नोंद करुन घेतलेली आहे. सदरहू विषयाची बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या दिनांक २१ जून, २००२ रोजी झालेल्या बैठकीतही ठेवण्यात आली होती. अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी दिलेल्या निदेशावर कार्यवाही करण्यात येत आहे असे पुढे नमूद केले.

३.३ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्राधिकरणाकडे असलेला निधी मुंबई महानगर प्रदेशातील मोठया नागरी प्रकल्पांवर खर्च करावा असे निदेश दिले.

<u>बाब क्र. ४</u> : <u>मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सन २००२-०३ चे वार्षिक कार्यक्रम.</u>

४.१ या विषयावर मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सांगितले की, प्राधिकरण हया आर्थिक वर्षात चव्वेचाळीस योजना हाती घेणार आहे. यामध्ये सर्वेक्षण व अभ्यास, स्थानिक संस्थांना अनुदाने व नागरी प्रकल्पासाठी कर्जे तसेच प्राधिकरणाच्या विविध प्रकल्पांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे मेगासिटी व मुंबई नागरी फंडातूनही विविध प्रकल्पांसाठी कर्ज देण्याचे प्रस्तावित केले आहे. वार्षिक कार्यक्रमामध्ये एकूण रु.७७६.५३ कोटीची तरतूद विविध प्रकल्पांसाठी करण्यात आलेली आहे.

४.२ वार्षिक कार्यक्रमावर चर्चा करतेवेळी, मा.मुख्यमंत्री यांनी स्काय बस मेट्रो प्रकल्पाबाबत विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी सांगितले की, सदर प्रकल्प अंधेरी ते घाटकोपर या दरम्यान राबविण्याच्या दृष्टीने सल्लागारांमार्फत तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास हाती घेण्यात आला आहे. त्याचा अहवाल जुलै, २००२ महिन्यात अपेक्षित होता, परंतु तो आता ऑगस्टच्या शेवटी येईल अशी अपेक्षा आहे. हया मार्गाचा अपेक्षित खर्च सुमारे रु.४५० कोटी असेल. सदर प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरण करा (BOT) हया तत्वावर राबविण्याचा विचार आहे. परंतु त्यासाठी शासनातर्फे काही फंड उभा करावा लागेल. प्राधिकरण सुमारे रु.१०० कोटीची इक्वीटी म्हणून देण्याचा विचार करीत आहे. या प्रकल्पाच्या एकूण ९.५ कि.मी. लांबीपैकी सुमारे १ ते १.५ कि.मी. हा मार्ग पायलट प्रोजेक्ट म्हणून सुरुवातीला उभारण्यात येईल. त्यावर स्काय बस मेट्रो प्रायोजित तत्वावर

चालविण्यात येऊन त्यावरील लोकांच्या प्रतिक्रिया विचारात घेऊन प्रकल्पाबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

४.३ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष यांनी विक्रांतचे सागरी संग्रहालयात रुपांतर करावयाच्या प्रकल्पाची सद्यःस्थितीची विचारणा केली. त्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने शासनाच्या निदेशानुसार रु.५ कोटीची रक्कम नौदलास विक्रांतची दुरुस्ती करण्यासाठी व रु.१.५ कोटी रक्कम टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स (TCE) यांना प्रकल्पाचा अभ्यास करण्यासाठी दिले आहेत. विक्रांत ही युध्दनौका "ऑयस्टर रॉकजवळ" कायम स्वरुपात उभी करता येईल व तीचे सागरी वस्तुसंग्रहालयात रुपांतर करता येईल असे टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स यांच्या अहवालात नमूद करण्यात आले असून त्यास सुमारे रु.१२० कोटी एवढा खर्च अपक्षित आहे. टाटा कन्सल्टिंग इंजिनियर्स यांच्या अहवालाच्या आधारे बांधा, वापरा व हस्तांतरण करा (BOT) या तत्त्वावर निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु फक्त एकच निविदा पत्र विकले गेले. ते एका डेन्मार्क येथील कंपनीच्या वतीने घेण्यात आले होते. हया कंपनीचे अधिकारी विक्रांत पहाण्यासाठी मुंबईस येण्याचेही निश्चित झाले होते. परंतु त्याच वेळी अमेरिका व युरोपीय राष्ट्रांनी त्यांच्या नागरीकांनी भारतास भेट देऊ नये असे निदेश दिल्याने ही भेट रद्द झाली. तसेच या कंपनीस ज्या बँकांनी अर्थसहाय्य देण्याचे आश्वासन दिले होते ते ही मागे घेण्यात आले. महानगर आयुक्तांनी पुढे असेही सांगितले की, त्यांनी लार्सन अँड टुब्रो, एस्सेल वर्ल्ड, रिलायन्स वगैरे स्थानिक गुंतवणूकदारांशी संपर्क साधला होता. परंतु सदर प्रकल्पासाठी रु.१२० कोटीची गुंतवणूकीची आवश्यकता असल्यामुळे ती करण्यास तूर्त कोणी पुढे येईल असे वाटत नाही. त्यावर मा.अध्यक्षांनी विक्रांत "ऑयस्टर रॉकजवळ" कायम स्वरुपात उभी करण्यासाठी आवश्यक असणारी कामे प्राधिकरणाने करावी व उर्वरित कामे म्हणजे संग्रहालय, उपहारगृहे वगैरे कामे खाजगी गुंतवणूकदारांकडून करुन घेण्याचा पर्याय तपासून घ्यावा असे आदेश दिले.

४.४ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, सध्या नौदलाने विक्रांतवर सागरी संग्रहालय तयार केले असून ते जनतेला ऑक्टोबर ते मे हया कालावधीत खुले ठेवण्यात येते. परंतु पावसाळयात मात्र विक्रांत नौदलाच्या डॉकयार्डमध्ये उभी करावी लागते. तसेच नौदल अधिका-यांनी त्यासाठी एक ट्रस्ट

स्थापन केला असून त्यास सुमारे रु.२० कोटीचा फंड (Corpus) मिळाल्यास विक्रांतवर सागरी संग्रहालय चालविणे शक्य आहे अशी त्यांची धारणा आहे. अर्थात पूर्ण वेळ विक्रांत पाण्यात राहिल्याने तिची मोठया प्रमाणात झीज होण्याची शक्यता आहे.

४.५ अधिवेशन व परिषद केंद्र वांद्रे-कुर्ला येथे करण्यासाठी बाजार पाहणी व शक्यता अभ्यास पूर्ण करण्यात आलेला आहे व त्याच्या आधारे Expression of Interest मागविण्यात आलेली आहे.

४.६ वार्षिक कार्यक्रमातील इतर प्रकल्पांवर चर्चा होऊन सन २००२-०३ चे वार्षिक कार्यक्रम मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९२५ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, (अ) टिप्पणीसह सादर केलेल्या २००२-०३ सालचा वार्षिक कार्यक्रम व २००२-०३ सालाचा मुंबई नागरी प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना - फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम संमत करण्यात येत आहे. (ब) वार्षिक कार्यक्रमांत अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र. ५ :</u> <u>मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे सन २००२-०३ चे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.</u>

सन २००२-०३ चे वार्षिक अंदाजपत्रक मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९२६ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाच्या अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २००२-०३ सालाचा अर्थसंकल्प आणि २००१-०२ सालचे सुधारीत अंदाज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) अन्वये मंजूर करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, २००२-०३ च्या अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात महाराष्ट्र निसर्ग उद्यान संस्थेला रु.११० लाख इतका भांडवली / विकास खर्चासाठी तसेच व्यवस्थापन व देखभालीच्या खर्चास आणि सन २००१-०२ हया वर्षात वरील संस्थेस अनुदान म्हणून अदा केलेल्या एकूण रु.११२ लाखाच्या खर्चास मान्यता देण्यास हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, २००२-०३ च्या अर्थसंकल्पात वडाळा मालमोटार अंतिम् स्थानक प्राधिकरणाला रु.१० लाख तसेच सन २००१-०२ हया वर्षात रु.१.५० लाख इतकी रक्कम वेतन व भत्ते, आस्थापना खर्च व इतर दैनंदिन खर्चासाठी अनुदान म्हणून देण्यास मान्यता देत आहे आणि हे प्राधिकरण महानगर आयुक्त यांना अनुदान देण्यास प्राधिकृत करीत आहे.

"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०९८/१७०/प्र.क्र.१३/ नवि-१०, दिनांक २०.६.२००१ प्रमाणे आय.एन.एस.विक्रांत या युध्द नौकेचे सागरी संग्रहालयामध्ये रुपांतर करण्याकरीता रु.६.५० कोटी रक्कम ठेव म्हणून शासनास देण्यात आली होती. सदर ठेवीची रक्कम प्रकल्प खर्च म्हणून दाखविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदरहु प्रकल्पावर हया अगोदर करण्यात आलेला खर्च व हयानंतर प्रकल्पावर होणारा सर्व खर्च यशस्वी निविदाकारांकडून व्याजासह प्राधिकरणाने वसुल करावा.

"त्यापुढे असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे कार्यकारी समितीला योजना सर्वेक्षणे इत्यादी कार्यक्रम अहवालात समाविष्ट न केलेल्या आणि प्रत्येकी रु.१० लाखापेक्षा अधिक व्यय नसलेल्या बाबींना मंजूरी देण्याचा आणि या मर्यादेपेक्षा अधिक व्यय नसलेला व मंजूर अर्थसंकल्पात तरतूद न केलेला कोणताही खर्च करण्याचा अधिकार, अशा प्रकरणाचा अहवाल आगामी बैठकीत प्राधिकरणाला सादर करण्याच्या अटींवर मान्यता देत आहे.

"त्यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण याद्वारे मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी आणि महानगर योजना - फिरता निधी यांचे अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे २००२-०३ चे अर्थसंकल्पीय अंदाज व २००१-०२ चे सुधारीत अंदाजास मंजूरी देत आहे."

**बाब क्र. ६ :** **मुं.म.प्र.- वास्तुवारसा संरक्षण संस्था व मुं.म.प्र.- पर्यावरण सुधारणा संस्था यांचे दिनांक १.४.२००० ते दिनांक ३१.३.२००१ या कालावधीचे परिक्षीत लेखे व वार्षिक अहवाल.**

प्राधिकरणाने दोन्ही संस्थेचे सन २०००-०१ चे परिक्षीत लेखे व वार्षिक अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र. ७ :** **अल्मेडा कंपाऊंड, सायन (पूर्व) येथील झोपडपट्टीवासियांसाठी शौचालय बांधण्याकरिता प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेसंबंधी 'ना हरकत दाखला' देणेबाबत.**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ९२७ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, वडाळा भारवाहक तळ, अल्मेडा कंपाऊंड सायन (पूर्व) येथील झोपडपट्टीवासियांसाठी १० फूट x ३४ फूट = ३४० चौरस फूट जागेवर १० शौचकूपे बांधण्यासाठी ना-हरकत दाखला देण्यात आलेल्या कार्यवाहीस बाब टिप्पणीतील अटी व शर्तींच्या अधीन राहून हे प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी देत आहे."

**बाब क्र. ८ :** **वडाळा भारवाहक तळ येथील चार इमारतीतील वाटप केलेल्या गाळयांच्या भाडेपट्टा अधिमूल्याची वसूली.**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ९२८ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ३चे पोटकलम (२) ला अनुसरुन मिळालेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत

सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री.कपिला योगेश द्वारकादास यांना भाडेपट्टा अधिमूल्याची रक्कम भरण्यासाठी आणखी ७ दिवसांची मुदतवाढ १४% दंडनीय व्याज आकारुन देण्यास मान्यता देत आहे. तसेच याबाबतीत महानगर आयुक्तांनी घेतलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी पुढील सर्व उपाययोजना करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

<u>बाब क्र. ९ :</u> <u>धारावी विधानसभा मतदार क्षेत्रातील झोपडपट्टयांना प्राथमिक सुविधा पुरविण्याकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत.</u>

९.१ या विषयावर चर्चा होत असताना मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी धारावी येथील झोपडपट्टीवासियांना प्राथमिक सुविधा पुरविण्यास प्राधिकरणाने फक्त भांडवली खर्चासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, परंतु त्याची देखभाल व दुरुस्तीचा खर्च मुंबई झोपडपट्टी सुधार समितीने व तेथे राहणा-या रहिवाशांनी करावा असे सांगितले.

९.२ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी झोपडपट्टयांना प्राथमिक सुविधा पुरविण्याबाबतचे मुं.म.प्र.वि.प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिकेचे धोरण एकच असावे असे निदेश दिले.

९.३ सदर बाबीवर चर्चा होऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९२९ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (म्हाडाचा घटक) यांना धारावी विधानसभा मतदार क्षेत्रातील प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात असलेल्या झोपडपट्टयांना प्राथमिक सुविधा पुरविण्याकरीता रु.२३५.०५ लाख इतका निधी अनुदान रुपाने देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर निधी अदा करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सदर कामांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना येणा-या अडचणींचा आढावा घेऊन सदर प्रस्तावात जागेच्या संदर्भात किंवा कामांच्या स्वरुपात किरकोळ बदल करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

<u>बाब क्र. १०</u> : <u>मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील रु.८०००-१३५०० आणि त्याहून कमी वेतनश्रेणीतील अधिकारी / कर्मचा-यांना दिनांक १ ऑगस्ट, २००१ पासून सेवा अंतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत.</u>

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचा-यांना शासनाप्रमाणे वेतन / भत्ते देण्यात येतात असे सांगितले. तसेच शासनाने ज्यांची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० आणि त्याहून कमी आहे आणि एकाच संवर्गामध्ये नियमित १२ वर्षे सेवा पूर्ण केली आहे तसेच ज्यांना १२ वर्षाच्या सेवा कालावधीमध्ये पदोन्नतीची संधी उपलब्ध झालेली नाही अशा अधिकारी / कर्मचा-यांसाठी आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. ही योजना प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचारी यांना लागू करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणापुढे मान्यतेसाठी सादर केला आहे. तसेच वरिष्ठ वेतनश्रेणी देतेवेळी शासनाच्या अटी व शर्तीची अंमलबजावणीही करण्यात येईल असेही महानगर आयुक्त यांनी सांगितले.

सदर बाब टिप्पणीवर चर्चा होऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.९३० :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी ज्यांची वेतनश्रेणी रु.८०००-१३५०० आणि त्याहून कमी आहे व ज्यांनी एकाच संवर्गामध्ये नियमित १२ वर्षे सेवा पूर्ण केली आहे व ज्यांना सदरहू कालावधीमध्ये पदोन्नतीची संधी उपलब्ध न झाल्यामुळे पदोन्नती पदाची वेतनश्रेणी किंवा जेथे पदोन्नतीचे पद उपलब्ध नाही तेथे शासन निर्णय क्र.वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दिनांक २० जुलै, २००१ मधील परिशिष्टामध्ये (जोडपत्र-४) नमूद केल्याप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यास शासनाच्या अटी व शर्तीनुसार या ठरावाद्वारे मंजूरी देण्यात येत आहे. तसेच सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे अधिकार महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात येत आहे."

**बाब क्र. ११ :** **मुंबई महानगर प्रदेशातील क्षेत्रामध्ये ग्रामसुधार योजनेखाली आर्थिक वर्ष २०००-२००१ साठी रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या अनुदानास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

११.१ महानगर आयुक्त यांनी रायगड, ठाणे जिल्हा परिषदेच्या ग्राम सुधारणा योजनेवर अनुदान देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता असे सांगितले. प्राधिकरणाने ठाणे जिल्हा परिषदेच्या रु.३२.२५ लाख खर्चाच्या १० ग्रामसुधारणा योजनेस कार्योत्तर मंजूरी दिली परंतु रायगड जिल्हा परिषदेच्या रु.२७.९१ लाखाच्या पाच कामांना कार्योत्तर मंजूरी न देता माजी नगर विकास राज्यमंत्री यांनी सुचविलेल्या योजना लक्षात घेवून पुन्हा रायगड जिल्हा परिषदेस प्रस्ताव सादर करण्यास सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे रायगड जिल्हा परिषदेने पुन्हा कामाचा आढावा घेवून प्रस्ताव सादर केला होता. त्यास मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांची मंजूरी घेण्यात आलेली आहे असेही सांगितले.

११.२ श्री.सचिन अहिर, सदस्य, प्राधिकरण यांनी माथेरान या परिसरातील आवश्यक ती कामे हाती घेण्याबाबत सूचना केली. त्यावर चर्चा होऊन माथेरान येथील कामाचे प्रस्ताव मागविण्यात यावेत असे ठरले.

११.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ९३१ :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, वरील बाब टिप्पणीत प्रस्तावित केल्याप्रमाणे ग्रामसुधार योजनेअंतर्गत सन २०००-२००१ साठी परिशिष्ट-१ मध्ये नमूद केलेल्या पाच कामांसाठी मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम, १९७४ चे कलम २१ (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन रायगड जिल्हा परिषदेला रु.२७,९१,२००/- खर्चाचे अनुदान देण्यास प्राधिकरण कार्योत्तर मंजूरी प्रदान करीत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र. १२ : मे.नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-१ वर अतिरिक्त चटई क्षेत्र देण्याबाबत.

सदर बाब टिप्पणीवर चर्चा होऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९३२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ (२) च्या तरतुदींनुसार त्यांस प्रयोज्य असलेल्या शक्तींचा वापर करुन प्राधिकरण या ठरावाद्वारे वरील बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे मे.नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांना वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील भूखंड क्र.सी-१ वर रु.२१,६००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्रफळ या दराने अधिमूल्य आकारुन १०४४.०५ चौ.मी. एवढे अतिरिक्त चटई क्षेत्र व तद्नुषंगाने ५२२.०२५ चौ.मी. एवढा जादा भूखंड प्राधिकरणाच्या जमीन विल्हेवाट (सुधारीत) विनियम १९९७ मधील तरतूदींनुसार देण्यास मान्यता देत आहे व याबाबतीत पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्यास, ज्यामध्ये भूखंडधारकाच्या गरजेनुसार वर नमूद केलेल्या क्षेत्रफळांत आवश्यक ती दुरुस्ती करण्याचा समावेश असेल, महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र. १३ : सिक्युरीटी ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या संस्थेची वांद्रे-कुर्ला संकुलात मुख्य कार्यालय बांधण्याकरीता भूखंड वाटपाची मागणी

१३.१ या बाबीवरील चर्चेच्या वेळी महानगर आयुक्त यांनी असे निदर्शनास आणले की, आंध्र प्रदेश शासनाने इप्डा या संस्थेच्या मुख्य कार्यालयासाठी हैद्राबाद येथे विनामूल्य जागा दिली आहे. तसेच सिक्युरीटी ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) यांना केंद्र शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही. त्यामुळे ही संस्था पूर्णपणे त्यांना मिळणा-या फी वर अवलंबून आहे. त्यामुळे सिक्युरीटी ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया या संस्थेने कार्यालयीन इमारतीसाठी एक भूखंड विनामूल्य किंवा नाममात्र किंमतीला मिळावा अशी विनंती केली आहे.

१३.२ बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९३३ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३, पोटकलम (२) नुसार जे अधिकार प्राधिकरणाला प्रदान करण्यात आलेले आहेत त्यांचा वापर करुन तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) च्या नियम क्रमांक १६ च्या तरतुदींनुसार या संबंधातील नियम या वाटपापुरते शिथिल करुन आणि इतर सर्व अधिकारांचा या संदर्भात उपयोग करुन हे प्राधिकरण वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील ५८०६.३९ चौ.मी. क्षेत्राचा, त्यावरील ११६१२.७८ चौ.मी. (१,२५,००० चौ.फुट) इतक्या अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राचा सोईस्कर भूखंड, सिक्युरीटी ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांना त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी कार्यालयीन इमारत बांधण्यासाठी ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने व रुपये १६०००/- प्रती चौ.मी. बांधकाम क्षेत्र या सवलतीच्या दराने अधिमूल्य आकारुन, तसेच सदर वाटपापोटी भरावयाची रक्कम पुढे दिलेल्या तक्त्यानुसार ४ समान सहामाही हप्त्यात (व्याजाशिवाय) भरण्याची सवलत देण्यास परंतु हप्ता भरण्यास विलंब झाल्यास देय रक्कमेवर विलंबाच्या कालावधीसाठी १४% द.सा.द.शे. दराने दंडनीय व्याज आकारण्यास तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) च्या अन्य अटी व शर्तीच्या अधिन राहून वाटप करण्यास मान्यता देत आहे.

| हप्ता | कधी भरावा | किती |
|---|---|---|
| पहिला हप्ता | भाडेपट्टयाचा करार करतांना | २५ टक्के * |
| दुसरा हप्ता | पहिल्या हप्त्यानंतर ६ महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी किंवा जो त्यावरील बांधकामासाठी प्राधिकरणाने प्रारंभप्रमाणपत्र देण्यापूर्वी यापैकी जे आधी घडेल तेव्हा | २५ टक्के * |
| तिसरा हप्ता | पहिला हप्ता भरल्यानंतर १२ महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी | २५ टक्के * |
| चौथा हप्ता | पहिला हप्ता भरल्यानंतर १८ महिन्याचा कालावधी संपण्यापूर्वी किंवा प्रस्तावित बांधकामाबाबत भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत या कार्यालयाचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी यापैकी जे आधी घडेल तेव्हा | २५ टक्के * |

*. *हप्त्याची ठरलेली रक्कम विहित कालावधीमध्ये न भरता ते विलंबाने भरल्यास त्या देय रकमेवर विलंबाच्या कालावधीसाठी १४% द.सा.द.शे.या दराने व्याज आकारण्यात येईल.*

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सिक्युरीटी ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील (सुधारीत, १९९७) फॉर्म "ड" नुसार भाडेपट्टा करारामध्ये नमूद केलेली प्रस्तावित कार्यालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी दिलेली कालमर्यादा सेबीच्या अधिकार क्षेत्राबाहेरील कारणांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी पाळली नाही तर त्या परिस्थितीमध्ये सेबीची प्रस्तावित कार्यालयीन इमारत पूर्ण करण्यास लागणारा कालावधी वाढवून देण्यासाठी महानगर आयुक्त, अनुज्ञेय परिबध्द क्षेत्राच्या दर चौ.मी.ला रु.२५,०००/- या अधिमुल्यावर आधारित खालील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या दराने अतिरिक्त अधिमूल्य सेबीने प्राधिकरणाकडे भरल्यावर परवानगी देऊ शकतील :-

| कालावधी | | भरावयाच्या अतिरिक्त अधिमुल्याचा दर चौ.मी.चा आकार |
|---|---|---|
| १ वर्षापर्यंत | : | रुपये २५,०००/- हया अधिमुल्याच्या २५% |
| १ ते २ वर्षापर्यंत | : | रुपये २५,०००/- हया अधिमुल्याच्या ३५% |
| २ ते ३ वर्षापर्यंत | : | रुपये २५,०००/- हया अधिमुल्याच्या ४०% |

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण, सेबीला वाटप करण्यासाठी ५८०६.३९ चौ.मी. क्षेत्राचा, व त्यावरील ११६१२.७८ चौ.मी.(१२५००० चौ.फूट) इतक्या अनुज्ञेय बांधकाम क्षेत्राचा सोईस्कर भूखंड निवडण्यासाठी व भाडेपट्टेदाराबरोबर करावयाच्या भाडेपट्टा करारामध्ये आवश्यकता भासल्यास योग्य ते बदल करण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र. १४ :** **वांद्रे-कुर्ला संकुलात अपंग व मतिमंद यांच्या प्रस्तावित शाळेसाठी भूखंड मिळण्यासाठी सेव्ह दि चिल्ड्रन ऑफ इंडिया या संस्थेची मागणी.**

१४.१ महानगर आयुक्तांनी प्रस्तावातील पुढील मुद्दे प्रामुख्याने मांडले :-

अ) सेव्ह दि चिल्ड्रन ऑफ इंडिया ही संस्था अपंग व मतिमंद मुलांसाठी ड्राईव्ह-इन-थिएटर

येथे गेली १९ वर्षे शाळा चालवित आहे. परंतु जमीन मालकाने आता शाळा तेथून हलविण्यास सांगितले असल्याने संस्थेने वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये अपंग व मतिमंद मुलांकरीता शाळा उभारण्यासाठी भूखंड मिळावा अशी विनंती केली आहे.

ब) वांद्रे-कुर्ला संकुलामधील शाळेसाठी राखीव असलेल्या तीनही भूखंडांचे वाटप झाले असल्याने, भूखंडाचे वाटप करावयाचे झाल्यास प्रथम महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अन्वये नियोजन आराखडयामधील जमीन वापरात फेरबदल करणे आवश्यक आहे. त्यानुसार वाब टिप्पणीत 'जी' ब्लॉकमधील सध्याच्या R-3 या सामाजिक संस्थेसाठी राखीव असलेल्या भूखंडापैकी १५०० चौ.मी. भूखंडाचा वापर 'शाळा' असा बदलण्याची प्रक्रिया सुरु करावी लागेल.

क) जमीन वापरातील फेरबदल करण्याची वरील प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सदर भूखंड सेव्ह दि चिल्ड्रन ऑफ इंडिया या मागणीदार संस्थेस, सदर संस्था धर्मादाय न्यास असल्यामुळे मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) विनियम, १९७७ (सुधारीत १९९७) नुसार निविदा न मागविता सदर भूखंड वाटपाचा देकार देण्यास, तसेच ही संस्था सदर भूखंडाचा वापर अपंग व मतिमंद मुलांकरीता शाळा चालविण्यासाठीच करणार असल्यामुळे, पूर्वी शाळेसाठी आलेल्या दराच्या ५० टक्के म्हणजे १७००/- प्रती चौ.मी.बांधकाम क्षेत्र या दराने त्या संस्थेस भूखंड वाटपाचा देकार द्यावा.

१४.२ मुख्य सचिव यांनी प्रस्तावामध्ये वाटप करावयाच्या भूखंडावर मतिमंद मुलांची शाळा, समाज केंद्र व Asian Institute for Human Development उभारण्याचा प्रस्ताव आहे व त्या भूखंडापैकी नेमकी किती जागा मतिमंद मुलांच्या शाळेसाठी वापरण्यात येणार आहे अशी विचारणा केली.

१४.३ या संदर्भात असे स्पष्टीकरण देण्यात आले की, अर्जदार संस्थेने सादर केलेल्या प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित केलेल्या इमारतीच्या ४३०० चौ.मी.क्षेत्रापैकी सुमारे ३६०० चौ.मी. क्षेत्र शाळेशी

संबंधित वापरासाठी दर्शविलेले दिसते. या माहितीच्या आधारे अर्जदार संस्थेस फक्त ३००० चौ.मी. बांधकाम क्षेत्र उपलब्ध होऊ शकेल असा १५०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वाटप करण्याचा प्रस्ताव आहे.

१४.४ वरील मुद्दयांचा विचार करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९३४ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१)(सी) अन्वये वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोटकलम (२) मधील अधिकारांचा व या बाबतीत सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकारांचा वापर करुन, बाब टिप्पणीच्या परिच्छेद ४(इ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावित अपंग व मतिमंद मुलांच्या शाळेसाठी वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी' ब्लॉकमधील R-3 या भूखंडामधून वाटप करण्याचे प्रस्तावित केलेल्या १५०० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडापुरता मंजूर नियोजन प्रस्तावाप्रमाणे सध्याच्या "सामाजिक संस्था" या जमीन वापराऐवजी "शाळा" या जमीन वापरातील किरकोळ फेरबदल करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(३) तसेच कलम ३७(१) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर सर्व अधिकार वापरुन याद्वारे मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे, शासकीय राजपत्रात आणि दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये उपरोल्लेखित किरकोळ फेरबदलासंदर्भात नोटीस प्रसिध्द करण्यास आणि अशी नोटीस प्रसिध्द झाल्याच्या

तारखेपासून एक महिन्याच्या आत अशा फेरवदलावावत जनतेकडून आक्षेप व सूचना मागविण्यास मान्यता देत आहे. तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ ए अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वर नमूद केलेली नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१(३) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे निदेश देत आहे की, महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला व वरिष्ठ नियोजकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, यावावत आलेल्या सूचना किंवा आक्षेप यावर विचार करील आणि असे आक्षेप व सूचना दाखल करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अनुसार अंतिम मंजुरीचे पुढील सोपस्कार करण्यासाठी एक अहवाल प्रस्तावित फेरवदलासह प्राधिकरणाला विचारार्थ सादर करील.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, उपरोल्लेखित जमीन वापरातील वदल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सेव्ह दि चिल्ड्रन ऑफ इंडिया या मागणी करणा-या संस्थेस ही संस्था धर्मादाय न्यास असल्यामुळे मुवई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमीन विल्हेवाट) विनियमातील जमीन वाटपासंवंधीच्या कलम ४(iv) मधील तरतुदीनुसार निविदा न मागविता सदर संस्थेस भूखंड वाटपाचा देकार देण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे.

"पुढे असा ठराव करण्यात येत आहे की, सदर संस्था अपंग व मतिमंद मुलांची शाळा उभारण्यासाठीच प्रस्तावित भूखंडांचा वापर करणार असल्यामुळे सदर भूखंडाचा देकार पूर्वी शाळेसाठी आलेल्या दराच्या तुलनेत ५०% सवलतीच्या दराने, म्हणजेच रुपये १७००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने देण्यास तत्वतः मान्यता देण्यात येत आहे व या संवंधीचा प्रस्ताव महानगर आयुक्तांनी योग्य वेळेस प्राधिकरणास सादर करावा, असे निदेश देण्यात येत आहेत."

बाब क्र.१५ : **प्रदर्शने, व्यापारी जत्रा, संगीत व सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची मैदाने तात्पुरत्या भाडेपट्टयाने देण्याबाबतच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाची मैदाने तात्पुरत्या वापरासाठी भाडेपट्टयाने देण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे असे सांगितले. तसेच प्राधिकरणाने गेल्या वर्षी सुमारे रु.४५ लाख रक्कम, मैदाने तात्पुरत्या भाडेपट्टयाने देऊन मिळविलेली आहे. सुधारीत भाडेपट्टीच्या दराची टिप्पणी मुख्य सचिव यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली असता मा.मुख्य सचिव यांनी तात्पुरत्या भाडेपट्टयाने देण्यात येणा-या मैदानाच्या जागेत दरवर्षी ५ टक्के वाढ करावी असे सुचविले आहे. सदरहू प्रस्तावावर चर्चा होऊन त्यानंतर प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९३५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ (२) अन्वये प्राप्त झालेल्या व अन्य अधिकारांचा उपयोग करुन प्राधिकरण याद्वारे परिच्छेद ६ मध्ये शिफारस केल्याप्रमाणे प्राधिकरणाची मैदाने तात्पुरत्या वापरासाठी भाडयाने देण्यासाठी सुरक्षा अनामत घेण्यासाठी, तसेच या धोरणाप्रमाणे प्राधिकरणातर्फे हाती घेतलेल्या मुलभूत सुविधांच्या बांधकामावर किंवा प्राधिकरणाच्या मालमत्तेवर प्रतिकूल परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन, तात्पुरत्या उपयोगासाठी भूखंड देण्यासाठी महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.१६ : **वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'ए' ब्लॉकमधील म्हाडाच्या मालकीच्या भूखंडावरील 'अधिवेशन संकुल' या आरक्षणात 'वाणिज्यिक संकुल' असा फेरबदल शासन निर्देशान्वये करणेबाबत.**

महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना असे सांगितले की, संबंधित भूखंड वांद्रे रेक्लमेशनमध्ये असून तो महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) मालकीचा

आहे. प्राधिकरणाच्या १९७८ च्या नियोजन प्रस्तावात तो "कन्व्हेंशन सेंटर" साठी आरक्षित होता. परंतु १९९१ च्या सागरी किनारा नियंत्रणामुळे त्यातील बरेचशे क्षेत्र सीआरझेडने बाधित झाले. उरलेले क्षेत्र "कन्व्हेंशन सेंटर" साठी अपूरे असल्याने व ७.५ हेक्टर एवढया क्षेत्राचा भूखंड त्यासाठी 'जी' ब्लॉकमध्ये प्रस्तावित केला असल्याने प्राधिकरणाने संबंधित भूखंडाचे आरक्षण "सामाजिक संस्था संकुलासाठी" बदलण्याचे ठरवून शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविला. परंतु शासनाने तो अमान्य करुन संबंधित आरक्षण "वाणिज्यिक संकुल" असे बदलण्याचे निदेश दिले आहेत. हे स्पष्टीकरण लक्षात घेऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. ९३६ :</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० (१) (सी) अन्वये वांद्रे-कुर्ला संकुल अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (३) तसेच बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अनुसार दिलेल्या निर्देशानुसार प्राधिकरण याद्वारे मंजूर नियोजन प्रस्तावांस बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे संकुलाच्या 'ए' ब्लॉकमधील म्हाडाच्या भूखंडावरील आरक्षणात "अधिवेशन संकुल" या ऐवजी "वाणिज्यिक संकुल" असा जमिन वापर फेरबदल करण्यास मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत सहाय्यभूत ठरणा-या इतर अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे शासकीय राजपत्रात आणि दोन स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये नोटीस प्रसिध्द करण्यास आणि अशी नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अशा फेरबदलाबाबत जनतेकडून आक्षेप व सूचना मागविण्यासाठी मान्यता देत आहे.

"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १३९ अन्वये तसेच मुं.म.प्र.वि.प्रा. अधिनियम, १९७४ च्या कलम ७ ए अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वर नमूद केलेली नोटीस प्रसिध्द करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५१ (३) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे निदेश देत आहे की, महानगर आयुक्त किंवा महानगर आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला व वरिष्ठ नियोजकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी, याबाबत आलेल्या सूचना किंवा आक्षेप याबाबत विचार करील आणि असे आक्षेप व सूचना दाखल करणा-या व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अनुसार मंजुरीचे संस्कार करण्यासाठी एक अहवाल प्रस्तावित फेरबदलासह प्राधिकरणाला सादर करील."

बाब क्र.१७ : वडाळा मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणास अनुदान देणेबाबत.

महानगर आयुक्त यांनी वडाळा मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणाची स्थापना शासन निर्णयानुसार करण्यात आली आहे असे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची वडाळा मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणावर नियुक्ती करण्यात आली असून कामकाज सुरु झाले आहे. परंतु निधीची तरतूद शासनाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही. त्यामुळे वडाळा मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणास अनुदानाची आवश्यकता आहे.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.९३७ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २१-क नुसार मिळालेल्या अधिकारांचा व या बाबतीत लागू होणा-या इतर सर्व

अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे वाव टिप्पणीच्या परिच्छेद क्र.६ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, वडाळा मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणास सन २००१-०२ या वर्षात रु.१.५० लाख व पुढे त्यांच्या निधीचा स्वतंत्र स्त्रोत निर्माण होऊन प्राधिकरण निधीच्या बाबतीत स्वंयपूर्ण होईपर्यंत प्रत्येक वर्षाला सुमारे रु.१०.०० लाख याप्रमाणे अनुदान देण्यास मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाययोजना करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

वाव क्र.१८ : मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळावर मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाचे प्रतिनिधी नामनिर्देशित करण्याबाबत.

या विषयावर चर्चा होऊन मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळावर प्राधिकरणाचा प्रतिनिधी नामनिर्देशित करण्याबाबतचा निर्णय मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी घ्यावा असे ठरले.

वाव क्र.१९ : वडाळा भारवाहक तळ येथील सुविधा इमारतीत पोस्ट ऑफिस, पोलीस व अग्निशमन केंद्र याकरीता राखून ठेवलेल्या जागेचे वाटप नाममात्र दराने करणेबाबत.

महानगर आयुक्त यांनी वाव टिप्पणीतील प्रस्तावाबाबतची माहिती देताना, वडाळा भारवाहक तळ येथील सुविधा इमारतीमधील पोस्ट ऑफीस, पोलीस विभाग व मुंबई अग्निशमन केंद्र यांना लीव्ह अँड लायसेन्सवर कार्यालयासाठी जागा पहिल्या तीन वर्षासाठी प्रति चौ.मी.रु.१/- याप्रमाणे नाममात्र भाडे व पुढील १० वर्षाच्या कालावधीसाठी ५०% या दराने भाडे आकारण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले. मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी संबंधित विभागांनी हया प्रस्तावास सहमती दर्शविली आहे काय यासंबंधी विचारणा केली. त्यानंतर, वडाळा भारवाहक तळ येथे मुंबई अग्निशमन केंद्र, पोलीस स्टेशन व पोस्ट ऑफीस आवश्यक असल्याने त्यांना रु.१/- याप्रमाणे नाममात्र भाडे आकारण्यात यावे. मात्र त्या संस्थांनी विद्युत देयके, पाणीपट्टी, महापालिका कर, सेवा व देखभाल इत्यादी खर्च स्वतः करावा असेही सूचित करण्यात आले.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९३८ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरणाच्या दिनांक २७.११.१९९७ रोजीच्या ठराव क्र.७३७ मध्ये अंशतः बदल करुन तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे पोट कलम (२) मधील अधिकारांचा व या बाबतीत लागू होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण वडाळा भारवाहक तळ येथील सुविधा इमारतीमधील पोलीस विभाग व मुंबई अग्निशमन केंद्र यांना लिव्ह अँड लायसन्स तत्वावर देऊ केलेल्या कार्यालयीन व डॉर्मिटरी गाळयांसाठी दरमहा प्रति चौ.मीटरला रु.१/- याप्रमाणे नाममात्र भाडे आकारण्यास मंजूरी देत आहे. परंतु विद्युत, पाणी, महानगरपालिका कर, सेवा व देखभाल इत्यादी आकार संबंधीत विभागांनी स्वतः भरावा.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, निवासी क्षेत्रासाठी ठराव क्र.७३७ अन्वये आकारण्यात यावयाच्या भाडयाच्या दरात व वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त पूर्वीच्या अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल सुचविण्यात येत नाही.

"यापुढे असा ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.१० मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मुंबई महानगर टेलीफोन निगम लिमिटेड यासाठी राखून ठेवलेली कार्यालयीन जागा वडाळा मालमोटार अंतिम स्थानक प्राधिकरणासाठी कार्यालयीन वापरासाठी राखून ठेवावी.

"यापुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.११ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे तार विभागासाठी राखून ठेवलेली कार्यालयीन जागा व मुंबई महानगर टेलिफोन निगम लिमिटेड यासाठी राखून ठेवलेले डॉर्मिटरी व ६ निवासी गाळे निविदा मागवून त्यांची विल्हेवाट करण्यात यावी.

"त्यापुढे असा ठराव करण्यात येत आहे की, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील सर्व उपाययोजना करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.२० : **सूर्या योजनेच्या टप्पा - १ व २ साठी स्थानिक नगरपरिषदांना व शासनास वित्तीय सहाय्य देणे.**

महानगर आयुक्तांनी सूर्या पाणी पुरवठा योजनेच्या टप्पा-१ व टप्पा-२ याबाबत सविस्तर माहिती दिली व या योजनेला मा.मुख्यमंत्री यांनी घेतलेल्या दिनांक ७.६.२००२ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे शासनाची मान्यता मिळाल्याचे सांगितले. महानगर आयुक्तांनी पुढे सांगितले की, या योजनेच्या वित्तीय आकृतीबंधानुसार रु.८५.१४ कोटी शासनाला अनुदानापोटी व रु.१२३.०५ कोटी विरार, नालासोपारा, नवघर-माणिकपूर व वसई या नगरपालिकांना प्राधिकरणाकडून कर्ज घेणे आवश्यक आहे. यापैकी रु.९.८५ कोटी रक्कम केलेल्या कामाच्या खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून दिनांक १२ जुलै, २००२ रोजी वितरीत केल्याचे त्यांनी सांगितले. महानगर आयुक्तांनी शासनाला व नगरपरिषदांना देण्यात येणा-या कर्जावरील प्रस्तावित व्याजाचा दर व इतर माहिती दिली.

मुख्य सचिवांनी नगरपरिषदांची संयुक्त समिती (Joint Committee) स्थापन करण्यासंबंधी काय सद्यःस्थिती आहे याबाबत विचारणा केली व नगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्यासंबंधी त्वरित कार्यवाही करावी, अशी नगर विकास विभागाच्या प्रतिनिधीला सूचना दिली.

त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९३९ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१ (अ) अंतर्गत प्राप्त झालेल्या तसेच याबाबतीत सहाय्यभूत होणा-या इतर शक्तींचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे खालील बाबींना मान्यता देत आहे.

१. सूर्या योजनेच्या (टप्पा १ व २) शासकीय अनुदानापोटी प्राधिकरणाकडून घ्यावयाच्या रु.८५.१४ कोटी रकमेचा प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त करावा. हा निधी प्रतिवर्षी ९% व्याज दराने व ५ ते ७ वर्षांच्या (शासन मान्य करेल त्याप्रमाणे) परतफेडीच्या कालावधीने,

शासनास अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन दयावा. सदर निधीचे वितरण योजनेवरील खर्चाच्या प्रमाणात थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास करावे. शासकीय अनुदानापोटी प्राधिकरणाने यापुढे दयावयाच्या रकमा यासंबंधीच्या व्यवस्थेस अंतिम स्वरुप दिल्यानंतरच वितरित कराव्यात.

२. सूर्या योजनेच्या टप्पा-१ साठी आतापर्यंत दिलेल्या रु.६५.०७ कोटी पैकी रु.५८.०१ कोटी रक्कम नगरपरिषदांना दयावयाच्या कर्जापोटी समजावी व उर्वरित रु.७.०६ कोटी शासकीय अनुदानापोटी शासनास वा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास दिलेली रक्कम समजावी. रु.५८.०१ कोटी कर्जाच्या रकमेचे नगरपरिषद-निहाय वितरण मंजूर आकृतिबंधानुसार परिच्छेद २ क मध्ये दाखविल्याप्रमाणे असावे.

३. सूर्या योजनेच्या टप्पा-२ साठी रु.६५.०४ कोटीचे कर्ज वसई, विरार, नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपरिषदांना दयावयास तत्वतः मान्यता दयावी.

४. योजनेच्या टप्पा-१ व टप्पा-२ साठी नगरपरिषदांना दयावयाच्या कर्जासाठी प्रतिवर्षी ९% व्याजदर लावावा व कर्ज परतफेडीचा कालावधी ३० वर्षांचा असावा. योजनेच्या अंमलबजावणीचा कालावधी कर्ज परतफेडीच्या कालावधीमध्ये समाविष्ट नसावा व या दरम्यान व्याजाचे कर्जात रुपांतर करण्यात यावे.

५. नगरपरिषदांना दयावयाच्या कर्जाच्या शर्ती तपशीलवार मूल्यनाच्या आधारे प्राधिकरणाच्या संमतीने नंतर ठरवाव्यात. टप्पा-२ साठी निधीचे रु.६५.०३ कोटी वितरण प्राधिकरणाने कर्जाच्या शर्ती मंजूर केल्यानंतरच करावे.

६. नगरपरिषदांची संयुक्त समिती एका निगम निकायाच्या स्वरुपात (Body Corporate) स्थापन करण्यासाठी प्राधिकरणाने नगर विकास विभागाकडे पाठपुरावा करावा व नगरपरिषदांसाठी दयावयाची कर्जाची रक्कम, विधीनुसार योग्य असेल त्याप्रमाणे संयुक्त समितीस अथवा संबंधित नगरपरिषदांना दयावी. पण याचे प्रत्यक्ष वितरण थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास योजना राबविण्यासाठी करावे.

“पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाच्या अधिन राहून त्यासंबंधीची सर्व कार्यवाही करण्यास प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.”

**बाब क्र.२१ :** **मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय भागातील रस्त्यांची सुधारणा करणे; भिवंडी काटई कांबे लिंक रस्ता (बंदर रोड ब्रीज ते एकता चौक रस्ता) मंजूरीबाबत.**

२१.१ बाब क्र.२१ व बाब क्र.२६ एकत्र विचारात घ्याव्यात अशी विनंती प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी केली व असा खुलासा केला की, प्राधिकरणातर्फे "महानगर प्रदेशाच्या बाहय भागातील रस्ते सुधारणा" हा प्रकल्प राबविला जातो. त्यानुसार सन १९९७-९८ मध्ये ठाणे जिल्हयासाठी एक उप-प्रकल्प प्राधिकरणाने मान्य केला आहे. त्यांची कामे ठाणे जिल्हा परिषदेतर्फे प्रगतीपथावर आहेत. प्राधिकरणातर्फे मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय भागात वेगवेगळया ३ योजना राबविल्या जातात त्यांचे एकत्रित व सुसूत्रीकरण करुन एक सर्वंकष योजना प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी सादर करण्याचा विचार आहे. परंतु यासाठी एक ते दीड वर्षाचा कालावधी लागेल.

मध्यंतरी भिवंडी व मुरबाड येथील स्थानिक आमदारांनी अनुक्रमे भिवंडी तालुक्यातील एक रस्ता व कल्याण तालुक्यातील ४ रस्त्यांची सुधारणा या योजनेंतर्गत हाती घेण्यात यावी असे सुचविले आहे. हया रस्त्यांची अवस्था सध्या अतिशय खराब झाली असून त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण तातडीने करण्याचे आवश्यक आहे. या योजनेचा एकूण खर्च सुमारे रु.९१ लाख आहे व त्यापैकी ९०% अनुदान प्राधिकरणाने देण्याचा प्रस्ताव आहे.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ९४० :**

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम २१अ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशातील (महापालिका क्षेत्राबाहेरील) रस्त्यांच्या मूलभूत सोयीमध्ये सुधारणा करण्याच्या योजनेंतर्गत भिवंडी काटई कांबे लिंक रस्ता(बंदर रोड ब्रीज ते

एकता चौक) हया रस्त्याच्या अंमलवजावणीसाठी ठाणे जिल्हा परिषदेने कळविल्याप्रमाणे अंदाजित खर्च रु.१६,७१,३०७ आहे. त्यास आपली मान्यता देत आहे. सदर रस्ता तातडीने पूर्ण करण्यात यावा.

"असाही ठराव करण्यात येतो की, प्राधिकरण अंतिम अंदाजित रक्कमेच्या ९०% एवढे अनुदान ठाणे जिल्हा परिषदेला वरील रस्त्यासाठी देण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येतो की, वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून, याबाबतीत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि सर्वसाधारण मान्यता देण्यास, तसेच वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

बाब क्र.२२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे २००१-०२ सालचे वार्षिक लेखे.

प्राधिकरणाने सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९४१:

"असा ठराव करण्यात येत आहे की, विषय टिप्पणी सोबत सादर केलेल्या प्राधिकरणाच्या २००१-०२ सालच्या वार्षिक लेख्यांची प्राधिकरण याद्वारे नोंद घेत आहे व त्यास मान्यता देत आहे."

बाब क्र.२३ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २००१-०२ चा वार्षिक अहवाल.

प्राधिकरणाचा सन २००१-०२ चा प्रारुप वार्षिक अहवाल मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९४२ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या

२००१-०२ सालच्या वार्षिक अहवालास हे प्राधिकरण मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यासाठी हे प्राधिकरण महानगर आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे."

बाब क्र.२४ : **महाराष्ट्रासाठी मूलभूत सुविधा विकास अधिनियमाची रचना करण्यासाठी क्रिसील ॲडव्हायझरी सर्व्हिसेस (CAS) यांची नेमणूक करणेबाबत.**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ९४३:

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम, १९७४ च्या कलम १२(१)(ठ) व कलम २० अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्रासाठी मूलभूत सुविधा विकास अधिनियम तयार करण्यासाठी व त्याबाबतचा अभ्यास करण्यासाठी क्रिसील ॲडव्हायझरी सर्व्हिसेस यांच्या एकमेव स्त्रोत तत्वावर (Sole Source Basis) नेमणूकीस प्राधिकरण याद्वारे कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त यांना क्रिसील ॲडव्हायझरी सर्व्हिसेस बरोबर आवश्यक तो करार व पुढील आवश्यक असलेली कार्यवाही करण्यास तसेच आवश्यक असलेला अभ्यास विहित कालावधीत सुरु करुन पूर्ण करणे आणि विहित केलेल्या अटी व शर्तींची पूर्तता होते किंवा नाही याकडे योग्य लक्ष देणे व त्यानुसार वेळोवेळी कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४६ (सी) मधील तरतुदींनुसार एकमेव स्त्रोत तत्वावर (Sole Source Basis) समंत्रकाची नेमणूक करण्यास याद्वारे कार्यकारी समितीस अधिकार प्रदान करण्यात येत आहेत."

बाब क्र.२५ : **वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-एन्" ब्लॉकमधील सुमारे ४००० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाचा जमीन वापर निवासी ऐवजी "शैक्षणिक प्रयोजनार्थ" असा नियोजन प्रस्तावात किरकोळ फेरबदल करणे.**

२५.१ वांद्रे-कुर्ला संकुलाच्या सीमेवर भारत नगर, पत्थर नगर वगैरे दाट लोकवस्तीचे विभाग आहेत. या विभागात शाळा व महाविद्यालये यासाठी पुरेशी जागा नाही. समता विचार प्रतिष्ठान या संस्थेने या विभागातील विशेषतः अनुसूचित जाती, जमाती व अन्य दलितवर्गीय विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी, संगणक, व्यवस्थापन इत्यादी विषयातील शैक्षणिक सुविधा पुरविण्याची गरज भागविण्यासाठी सुमारे ५००० चौ.मी. क्षेत्राच्या भूखंडाची मागणी केली आहे व त्यास शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई यांनीही पाठिंबा दिला आहे. त्यानुसार वांद्रे-कुर्ला संकुलाच्या 'जी-एन' ब्लॉकमधील सुमारे ४००० ते ४५०० चौ.मी क्षेत्रफळाचा निवासी वापराऐवजी शैक्षणिक वापराचा भूखंड आरक्षणाखाली आणावा व त्यासाठी आवश्यक ती वैधानिक प्रक्रिया जमीन वापरातील फेरबदल करण्याची सुरु करावी असा प्रस्ताव महानगर आयुक्तांनी प्राधिकरणापुढे मांडला.

२५.२ त्यावर सदस्यांनी शाळेसाठी अशा प्रकारची किती आरक्षणे उपलब्ध करुन देता येतील व त्यासाठी काय किंमत लावण्यात येईल याबाबत एक धोरण ठरविणे आवश्यक आहे असे प्रतिपादन केले.

२५.३ मा.अध्यक्षांनी वरील सुचनेनुसार असे निदेश दिले की, यासंबंधी एक स्वतंत्र प्रस्ताव प्रथम प्राधिकरणापुढे आणावा.

**बाब क्र.२६ :** **मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय भागातील रस्त्यांची सुधारणा करणे - कल्याण तालुक्यातील ४ रस्त्यांच्या कामांना मंजुरी बाबत ...**

बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १४४ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, अधिनियम, १९७४ च्या कलम २१ अ नुसार मिळालेल्या अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणीमध्ये समाविष्ट केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेशातील (बृहन्मुंबई महापालिका क्षेत्राबाहेरील) रस्त्यांच्या मुलभूत सोयीमध्ये सुधारणा करण्याच्या योजनेंतर्गत (१)वासिंद-गेरेसे-वेहळे रस्ता (२)घोटसई-संत्याचापाडा-मानिवली रस्ता (३)खडवली-वाळकस-वेहरे रस्ता (४)वाहोली ते रोहन रस्ता हया रस्त्यांच्या अंमलबजावणीसाठी ठाणे जिल्हा परिषदेने कळविल्याप्रमाणे अंदाजित खर्च रु.७४.३०/- लाखाच्या खर्चाला आपली मान्यता देत आहे. सदर रस्ते तातडीने पूर्ण करण्यात यावेत.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, प्राधिकरण अंतिम अंदाजित रक्कमेच्या ९०% एवढे अनुदान ठाणे जिल्हा परिषदेला वरील रस्त्यांसाठी देण्यास मान्यता देत आहे.

"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील अटी व शर्तीच्या अधीन राहून, याबाबतीत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि सर्वसाधारण मान्यता देण्यास, तसेच वेळोवेळी अनुदान वितरित करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

*************

जोडपत्रे १ ते ४

जोडपत्र -१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १०३ वी बैठक

दिनांक : २२ ऑगस्ट, २००२

: ठ रा व :

श्री. जनार्दन दा. जाधव, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे माजी आयुक्त यांचे दिनांक २ एप्रिल, २००२ रोजी निधन झाले. श्री.जाधव हे दिनांक १६.५.१९९५ ते दिनांक १०.६.१९९६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री.जाधव यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.जाधव यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.

**********

जोडपत्र - 2

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १०३ वी बैठक

दिनांक : २२ ऑगस्ट, २००२

: ठ रा व :

श्री.अमरनाथ बटब्याल, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे माजी महानगर आयुक्त यांचे दिनांक २८ जुलै, २००२ रोजी निधन झाले. श्री.बटब्याल हे दिनांक १८.१०.१९८२ ते दिनांक २५.५.१९८५ या कालावधीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य-सचिव होते. या काळात श्री.बटब्याल यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.बटव्याल यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.

*************

जोडपत्र - 3

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १०३ वी बैठक

दिनांक : २२ ऑगस्ट, २००२

: ठराव :

श्री.सिताराम नारायण देसाई, माजी नगर विकास राज्यमंत्री यांचे दिनांक ६ ऑगस्ट, २००२ रोजी निधन झाले. श्री.देसाई हे दिनांक २९.१.१९८२ ते दिनांक १४.१०.१९८२ या कालावधीत नगर विकास राज्यमंत्री या नात्याने प्राधिकरणाचे तसेच त्यावेळच्या स्थायी समितीचे उपाध्यक्ष होते. या काळात श्री.देसाई यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण, त्यांच्या दुःखद आणि आकस्मिक निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

या ठरावाची प्रत दिवंगत श्री.देसाई यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे.

*************

## परिशिष्ट-एक

### शासन निर्णय, क्रमांक-वेतन ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा३
### दिनांक २० जुलै,२००१ सोबतचे परिशिष्ट एक
### सेवांतर्गत अश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय होणारी वेतनश्रेणी

| अनु. क्रमांक | विद्यमान सुधारित वेतनश्रेणी (रुपये) | अनुज्ञेय सुधारित वेतनश्रेणी (रुपये) |
|---|---|---|
| १. | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| २. | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० | २६५०-६५-३३००-७०-४००० |
| ३. | २६५०-६५-३३००-७०-४००० | २७५०-७०-३८००-७५-४४०० |
| ४. | २७५०-७०-३८००-७५-४४०० | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ५. | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| ६. | ३२००-८५-४९०० | ४०००-१००-६००० |
| ७. | ४०००-१००-६००० | ४५००-१२५-७००० |
| ८. | ४५००-१२५-७००० | ५०००-१५०-८००० |
| ९. | ५०००-१५०-८००० | ५५००-१७५-९००० |
| १०. | ५५००-१७५-९००० | ६५००-२००-१०५०० |
| ११. | ६५००-२००-१०५०० | ७४५०-२२५-११५०० |
| १२. | ७४५०-२२५-११५०० | ७५००-२५०-१२००० |
| १३. | ७५००-२५०-१२००० | ८०००-२७५-१३५०० |
| १४. | ८०००-२७५-१३५०० | १००००-३२५-१५२०० |

***********